महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती 7588005002 या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : दुसरे अंक : २० वा दिनांक : ०४/१०/२०२४ वार : शुक्रवार

## पुण्याच्या कार्यक्रमात अब्दुल सत्तारांच्या विरोधात ५० खोकेच्या घोषणा



**पुणे :** महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाच्यावतीने संवाद साधण्यासाठी राज्यातील सर्व बाजार समित्यांचे सभापती, उपसभापती व सचिव यांची गुरुवारी पुण्यातील निगडीतील ग. दि. माडगुळकर नाट्यगृह येथे राज्यस्तरीय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पणनमंत्री अब्दुल सत्तार यांच्या विरोधात घोषणाबाजी करण्यात आल्या. अब्दुल सत्तारचे करायचे काय, खाली डोके वर पाय, पन्नास खोके एकदम ओक्के, अशा घोषणा देण्यात आल्या.

राज्यातील बाजार समित्यांच्या कामकाजात करावयाचे कालानुरूप बदल, शेतमालाच्या विपणनामध्ये अंगीकारावयाच्या आधुनिक बाबी, शेतकरी व इतर सर्व बाजार घटकांना द्यावयाच्या सोयी-सुविधा, त्यात येणाऱ्या अडचणी व त्यावर करावयाच्या उपाययोजना इत्यादी विषयाचे अनुषंगाने येथील परिषदेत चर्चा करण्यात येणार होती. या राज्यस्तरीय परिषदेचे उद्घाटन पणन मंत्री अब्दुल सत्तार यांच्या हस्ते झाले. मात्र या कार्यक्रमाला अब्दुल सत्तार दीड तास उशिरा पोहोचले होते.

अब्दुल सत्तार उशिरा पोहोचल्याने एकाच प्रतिनिधीला बोलण्याचे निर्देश देण्यात आले. प्रतिनिधि बोलत असताना तुमचे प्रश्न मांडा, वाद निर्माण होईल असे वक्तव्य करू नका, असे सांगण्यात आले. तसेच मला राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीला जायचे असे म्हणून परिषदेतून काढता पाय घेतला. यामुळे बाजारसमितीच्या सर्वच सदस्य व पदाधिकाऱ्यांनी अब्दुल सत्तार यांच्या विरोधात घोषणाबाजी देण्यास सुरुवात केली.

## राहुल गांधी उद्या २ दिवसीय कोल्हापूर दौऱ्यावर : छत्रपतींच्या पूर्णाकृती पुतळ्याचे करणार अनावरण



**कोल्हापूर :** काँग्रेस नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्ष नेते खासदार राहुल गांधी उद्या शुक्रवारी कोल्हापूरच्या २ दिवसीय दौऱ्यावर येणार आहेत. या दौऱ्यात राहुल गांधी यांच्या हस्ते कसबा बावडा येथील भगवा चौकात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण होणार असून शनिवारी होणाऱ्या संविधान सन्मान संमेलनालाही ते उपस्थित राहणार आहेत. विधान परिषदेतील काँग्रेसचे गटनेते आमदार सतेज पाटील यांनी गुरुवारी ही माहिती दिली.

काँग्रेस नेते राहुल गांधी हे ४ व ५ ऑक्टोबर रोजी कोल्हापूर दौऱ्यावर येत आहेत. ४ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ६ वाजता कसबा बावडा येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पूर्णाकृती पुतळ्याचा भव्य अनावरण सोहळा खासदार राहुल गांधी यांच्या हस्ते होणार आहे. ५ ऑक्टोबर रोजी खासदार राहुल गांधी हे राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या समाधी स्थळी भेट देऊन अभिवादन करतील. त्यानंतर हॉटेल सयाजी येथे होणाऱ्या संविधान सन्मान संमेलनाला ते उपस्थित राहतील, अशी माहिती काँग्रेस आमदार सतेज पाटील यांनी दिली.

महाराष्ट्रात लवकरच विधानसभा निवडणुकीचा फड रंगणार आहे. या पार्श्वभूमीवर राहुल गांधी यांचा हा दौरा होणार असल्यामुळे त्यांच्या दौऱ्याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

राहुल गांधी यांचा दौरा कार्यक्रम खालील प्रमाणे

४ ऑक्टोबर सायंकाळी ५.३० वाजता कोल्हापूर विमानतळ येथे आगमन आणि कसबा बावडा येथील छत्रपती शिवाजी महाराज पूर्णाकृती पुतळा अनावरण कार्यक्रमाकडे प्रस्थान.

प्रवासाचा मार्ग : कोल्हापूर विमानतळ – शाहू नाका – शिवाजी विद्यापीठ – कावळा नाका – धैर्यप्रसाद चौक – एस.पी. ऑफीस चौक – भगवा चौक, कसबा बावडा, सायंकाळी ६ वाजता – कसबा बावडा येथील समारंभ संपल्यानंतर हॉटेल सयाजीकडे प्रयाण आणि मुक्काम

५ ऑक्टोबर रोजी दुपारी १ वाजता – हॉटेल सयाजी येथून राजर्षि छत्रपती शाहू महाराज समाधी स्थळाकडे प्रस्थान

प्रवासाचा मार्ग : हॉटेल सयाजी – कावळा नाका – दाभोळकर कॉर्नर – व्हिनस कॉर्नर – दसरा चौक - राजर्षि छत्रपती शाहू महाराज समाधी स्थळ, दु.१.३० वाजता - राजर्षि छत्रपती शाहू महाराज समाधी स्थळ येथे आगमन व अभिवादन, त्यानंतर संविधान सन्मान संमेलन कार्यक्रमास उपस्थिती.

स्थळ : राजर्षि छत्रपती शाहू महाराज पॅव्हेलियन, हॉटेल सयाजी, कोल्हापूर , सायंकाळी ४ वाजता – हॉटेल सयाजी येथून कोल्हापूर विमानतळकडे प्रयाण, असा त्यांचा दौरा कार्यक्रम असेल अशी माहिती आमदार सतेज पाटील यांनी दिली.

## लाडकी बहीण योजनेसाठी वसुली सुरू आता फक्त पाचशे रुपयाचेच बॉण्ड पेपर मिळणार



**मुंबई :** सरकारी आणि खासगी कामकाजात महत्वाची भूमिका बजावण्याऱ्या स्टॅम्पबाबत राज्य सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. १०० आणि २०० रुपयांच्या स्टॅम्पवर बंदी घालण्यात येणार आहे. त्यामुळे आता किमान ५०० रुपयांच्या स्टॅम्पवरच नोटरी, खरेदी, हक्क किंवा प्रतित्रापत्र दिले जाणार आहे. सरकारच्या या निर्णयाने सर्वसामान्य नागरिकांना मोठा फटका बसणार आहे. राज्य सरकारने महसुलात वाढ व्हावी यासाठी हा निर्णय घेतला असल्याची माहिती आहे.

तहसील किंवा महसुल कार्यालयात फक्त १०० आणि २०० रुपयांमध्ये वैयक्तिक कारणांसासह बँक आणि विविध कामे होत होती. परंतु आता यासाठी पाचशे रुपयांचे मुद्रांक शुल्क मोजावे लागणार आहे.

राज्य सरकारने पावसाळी अधिवेशनात मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेची घोषणा केली. या योजनेवरून विरोधकांनी राज्य सरकारवर सातत्याने टीका देखील केली आहे. सरकार तिजोरी खाली करत असल्याचा आरोप विरोधकांकडून करण्यात आला आहे. परंतु आता खऱ्या अर्थाने तशी परिस्थिती ओढावली जात असल्याची चर्चा महसूल विभागात सुरू आहे. लाडकी बहिण योजनेला जास्त पैसे लागत असल्यामुळे इतर योजनांसाठी पैसे कमी पडत असल्याची माहिती आहे. त्यामुळे पर्यायी मार्गाने पैसे मिळवण्याचा राज्य सरकारचा प्रयत्न आहे. यापूर्वी हक्कसोडपत्र, प्रतिज्ञापत्र,साठेखत केल्यानंतर पुन्हा खरेदीखत करण्यासाठी शंभर रुपयांचा स्टॅम्प वापरला जात असे. परंतु आता राज्य सरकारच्या नवीन नियमानुसार शंभरऐवजी पाचशे रुपयांचा स्टॅम्प वापरण्यात येणार आहे.

दरम्यान, कंपन्यांच्या एकत्रीकरण करणे किंवा पुनर्रचना विलिनीकरण करणे याचबरोबर विभागणीमध्ये भविष्यातील मतभेद मिटवण्यासाठी लवादामार्फत लेखी निर्णय दिला जातो. कंपन्यांचे भाग भांडवल जास्त असल्यामुळे स्थावर आणि जंगम मालमत्तेप्रकरणी अभिहस्तांतरणामध्ये सध्या पाचशे रुपये मुद्रांक शुल्क आकारणी होते. यात सर्वसामान्य नागरिकांना १०० आणि २०० रुपयांच्या स्टॅम्प पेपरवर आपले दस्तऐवज तयार करता येत होते. परंतु आता नवीन निर्णयानुसार त्यासाठी किमान ५०० रुपयांचा स्टॅम्प पेपरची अट ठेवण्यात आली आहे.

## सिद्धार्थ महाविद्यालयात वाणिज्य व नियोजन मंडळ व सामाजिक शास्त्र मंडळांचे उद्घाटन..




**जाफ्राबाद :** सिद्धार्थ महाविद्यालयात वाणिज्य व नियोजन मंडळ तथा सामाजिक शास्त्र मंडळांचे उद्घाटन समारंभाच्या कार्यक्रमाच्या प्रसंगी उद्घाटक म्हणून लाभलेले डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागातील डॉ. कैलास त्रिभुवन हे उद्घाटक म्हणून उपस्थित होते व प्रा.डॉ. मोहन वने हे देखील उपस्थित होते वाणिज्य व नियोजन मंडळ व सामाजिकशास्त्र नियोजन मंडळाचे उद्घाटन पर भाषणामध्ये विद्यापीठातील शैक्षणिक विभागाचे डॉ. कैलास त्रिभुवन म्हणाले की, प्रत्येक महाविद्यालयामध्ये वाणिज्य व नियोजन मंडळाचे उद्घाटन करणे गरजेचे आहे.

या माध्यमातून विद्यार्थ्यांना वाणिज्य व नियोजन मंडळ व सामाजिक शास्त्र मंडळ विषयी विद्यार्थ्यांना माहिती मिळते ते पुढे म्हणाले की आजच्या स्पर्धात्मक जगामध्ये वाणिज्य शाखेला मोठी मागणी प्राप्त झालेली आहे कारण वाणिज्य शाखेच्या माध्यमातून विविध प्रकारचे उद्योजक तथा उद्योग उभे राहिले जातात. व एक उद्योजक अनेक व्यक्तींना रोजगार निर्माण करून देत असतो त्यामुळे अनेक बेरोजगार तरुणांना रोजगार प्राप्त होते. अर्थशास्त्र विभागाचे प्रा. डॉ. मोहन वने म्हणाले की विद्यार्थ्यांनी दररोज कॉलेजमध्ये उपस्थिती राहुन महाविद्यालयातील विविध सुविधाचा फायदा घ्यावा. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षेकडे लक्ष दिले पाहिजे महाविद्यालयामध्ये स्पर्धा परीक्षा केंद्र उपलब्ध आहे या संधीचा विद्यार्थ्यांनी फायदा घ्यावा. कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. र. तु. देशमुख म्हणाले की, सध्याच्या स्थितीमध्ये वाणिज्य शाखेमध्ये विविध प्रकारच्या नोकरीच्या संधी उपलब्ध आहेत विद्यार्थ्यांनी या संधीचा फायदा घ्यावा असे आवाहन विद्यार्थ्यांना केले. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक प्रा. संजय साळवे यांनी केले तर सूत्रसंचालन प्रा.डाॅ. मनोज पगारे यांनी केले व आभार प्रदर्शन प्राध्यापिका मनियार एस .आर. यांनी केले कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.

## भाजपच्या माजी खासदार रूपा गांगुली यांना अटक

**कोलकाता :** बीआर चोप्रा यांच्या 'महाभारत' या टीव्ही मालिकेत द्रौपदीची भूमिका साकारणाऱ्या रुपा गांगुली यांनी अटक करण्यात आली आहे. त्या माजी राज्यसभा सदस्य आहेत. सध्या त्या भारतीय जनता पक्षाच्या नेत्या आहेत. स्थानिक महिला भाजप नेत्या रुबी दास यांच्या सुटकेच्या मागणीसाठी रुपा गांगुली या पोलीस ठाण्यासमोर धरणे आंदोलन करत होत्या. त्यावेळी त्यांना अटक करण्यात आली.

बुधवारी सकाळी (२ ऑक्टोबर) कोलकाता येथे इयत्ता नववीमधील एक विद्यार्थी कोचिंग सेंटरला जात होता. याच परिसरात रस्त्याचं काम देखील चालू होतं. या विद्यार्थ्याला जेसीबीने धडक दिल्याने त्याच्या डोक्याला गंभीर दुखापत होऊन त्याचा मृत्यू झाला. विद्यार्थ्यांच्या मृत्यूनंतर प्रभाग क्रमांक ११३ च्या स्थानिक नगरसेवक अनिता कर मजुमदार या परिसरात उपस्थित राहिल्या नसल्याची तक्रार रहिवाशांनी केली. यानंतर रस्त्यावर निदर्शने सुरू झाली. यावेळी भाजप नेत्या रुबी मॉडल यांच्यासह एकूण पाच जणांना अटक करण्यात आली. या निषेधार्थ बुधवारी रात्री रुपा गांगुली यांच्यासह भाजप कार्यकर्ते आणि समर्थकांनी बांसद्रोणी पोलीस स्थानक गाठलं. रुपा गांगुली यांनी पोलीस स्थानक गाठल्यावर रुबी मॉडलसह अन्य कार्यकर्त्यांना अटक केली मात्र, विद्यार्थ्याचा मृत्यू झाल्याप्रकरणी एकाही आरोपीला अद्याप अटक करण्यात आलेली नाही, असे आरोप केले.तसेच विद्यार्थ्याच्या मृत्यूप्रकरणी संबंधित आरोपींना अटक होईपर्यंत स्टेशन बाहेर बसून राहणार असंही त्या म्हणाल्या होत्या. या प्रकरणी रूपा गांगुली यांनी निषेध व्यक्त केला. बुधवारी रात्रीपासून त्या बांसद्रोणी पोलीस ठाण्याबाहेर निदर्शने करत होत्या.

यानंतर गुरुवारी सकाळी त्यांना अटक करण्यात आली आहे.रूपा गांगुली यांच्याबद्दल बोलायचे झाल्यास त्यांनी हिंदी आणि बंगाली चित्रपटसृष्टीत काम केले आहे. 'महाभारत'मध्ये साकारलेल्या द्रौपदीच्या भूमिकेने त्यांना मोठ्या प्रमाणात प्रसिद्धी मिळाली. नंतर त्या भाजपमध्ये दाखल झाल्या आणि राज्यसभा सदस्यही झाल्या.

## आधी भाजप उमेदवाराचा प्रचार आणि तासाभरात काँग्रेसमध्ये प्रवेश

**हरयाणा :** हरयाणात एका नेत्याने आधी भाजपसाठी प्रचार केला. त्यानंतर तासाभरात काँग्रेसच्या मंचावर जात काँग्रेसमध्ये प्रवेश घेतला. अशोक तंवर असे या नेत्याचे नाव असून ते माजी खासदार आहेत.अशोक तंवर दुपारी बारा वाजता नलवा भागात भाजपसाठी प्रचार कत होते. यावेळी त्यांच्यासोबत भाजप नेते कुलदीप बिश्नोई आणि राजेंद्र राठोडही उपस्थित होते. यावेळी भाजपला मतदान करा असे आवाहनही त्यांनी केले होते. त्यानंतर तासाभराने राहुल गांधी यांची प्रचारसभा होती. तंवर या प्रचारसभेला आले आणि राहुल गांधी यांच्या उपस्थितीत काँग्रेसमध्ये प्रवेश घेतला.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ०४ ऑक्टोबर २०२४


## मुक्त विद्यापीठाच्या प्रवेश प्रक्रियेस ९ ऑक्टोबरपर्यंत मुदतवाढ

**नाशिक** : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या कृषी शिक्षणक्रम, बी. एड. (सेवांतर्गत ) व बी. एड. (विशेष) या शिक्षणक्रमांव्यतिरिक्त उर्वरित सर्व शिक्षणक्रमांची २०२४-२५ या शैक्षणिक वर्षाच्या ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेला दि. ९ ऑक्टोबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

विद्यार्थी या कालावधीत विलंब शुल्क न भरता प्रवेश घेऊ शकतात, अशी माहिती विद्यापीठाच्या विद्यार्थी सेवा विभागाचे संचालक प्रा. प्रकाश देशमुख यांनी दिली आहे.

विद्यापीठाची वेबसाइट ycmou. digitaluniversity.ac या संकेतस्थळावरील होमपेजवर Admission या टॅबवर Prospectus (माहिती पुस्तिका) २०२४-२५ या ठिकाणी विविध शिक्षणक्रमांच्या माहिती पुस्तिका उपलब्ध आहेत. प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी वर नमूद केलेल्या विहित कालावधीत ऑनलाइन पद्धतीने पूर्णपणे व अचूक भरलेला प्रवेश अर्ज आणि प्रवेश घेत असलेल्या शिक्षणक्रमाचे शुल्कही ऑनलाइन पद्धतीने भरून प्रवेश अर्ज सादर करावयाचे आहेत.

काही विद्यार्थ्यांना त्यांच्या विविध अडचणींमुळे शिक्षणक्रमास प्रवेश घेता आलेला नसल्यामुळे, अशा विद्यार्थ्यांची गैरसोय टाळण्यासाठी ही मुदतवाढ देण्यात आलेली आहे. तरी जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी वरील मुदतीत प्रवेश घ्यावा, असे आवाहन मुक्त विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे, प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिह बिसेन विद्यार्थी सेवा विभागाचे संचालक डॉ.प्रकाश देशमुख यांनी केले आहे

## भारत जागतिक महासत्ता बनण्यासाठी सामान्य माणसाची क्रयशक्ती वाढली पाहिजे - प्राचार्य डॉ.विश्वास कदम



**पाचोड** : शिवछत्रपती कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात 'शिवछत्रपती विचार विकास' व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली होती मंगळवारी सातवे पुष्प गुंफण्यात आले यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून अंबड मत्स्योदरी महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. विश्वास कदम आणि मार्गदर्शक म्हणून डॉ. शिवाजी यादव उपस्थित होते कार्यक्रमाचे अध्यक्षीय स्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रसेन कोठावळे यांनी भूषविले मार्गदर्शनपर संबोधनामध्ये डॉ. यादव म्हणाले की भारताची लोकसंख्या आज जगात क्रमांक एक ची आहे त्यातल्या त्यात तरुण वर्ग मोठ्या प्रमाणावर आहे जर या तरुण वर्गाचे कामगार शक्तीमध्ये जर रूपांतर करण्यात आले तर नक्कीच भारत महासत्ता बनेल महिलांचाही सहभाग कसा वाढवता येईल यावरही विचार करणे महत्त्वाचे आहे डॉ. विश्वास कदम म्हणाले की सर्वसामान्य माणसाची क्रयशक्ती वाढली पाहिजे सुशिक्षित बेरोजगार तरुणांच्या हाताला काम मिळाले पाहिजे आर्थिक विषमता कमी करण्यासाठी प्रयत्न झाले पाहिजे अध्यक्षीय समारोपप्रसंगी डॉ. कोठावळे म्हणाले की सुशिक्षित तरुण वर्गाला जास्तीत जास्त रोजगारभिमुक शिक्षण देणे महत्त्वाचे आहे नवीन तंत्रज्ञानासोबत कौशल्य विकासाचे ज्ञान देणे गरजेचे आहे स्वयंरोजगार निर्मिती मोठ्या प्रमाणावर करावी लागेल अर्थ धोरण ठरवताना या बाबीचा विचार झाला पाहिजे या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. विनोद कांबळे यांनी केले तर प्रास्ताविक शिवछत्रपती विचार विकास व्याख्यानमालेचे समन्वयक डॉ.गांधी बानायत यांनी केले आभार डॉ. हेमंत कुमार जैन यांनी मानले यावेळी डॉ.सुरेश नलावडे डॉ. भगवान जायभाय डॉ. सुभाष पोटभरे डॉ. उत्तम जाधव डॉ. विलास महाजन प्रा. संदीप सातोणकर डॉ. तुकाराम गावंडे प्रा. सचिन कदम डॉ.हरिप्रसाद बिडवे डॉ.विठ्ठल देखने अनिल नरवडे वैभव राऊत ज्ञानेश्वर बेटूळे आदी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते

## "प्रिय सखे"

**डॉ. बाळासाहेब लिहिणार**



प्रिय सखे तू मला सर्व काही मागू शकतेस
फक्त मागणी करून नकोस माझ्या हृदयाची
कारण ते या देशासाठी केव्हाच अर्पण केलय

शक्य होईल तर उद्या तुझ्या पोटात
जन्म घेणाऱ्या गर्भास देखील सांग
बाळ तुझा बाप एक देशभक्त आहे,
देशप्रेमी आहेतुलाही तसेच व्हावे लागेल.
मान्य असेल तर बाहेर ये
नाहीतर आतल्या आतच विरून जा.

कित्येक वर्ष परकियांनी राज केलं इथे
कुठे डच, कुठे पोर्तुगीज, कुठे मोगल.
इंग्रजांनी तर धुमाकूळच घातला होता
त्यांच्या जोखडातून मुक्त करणाऱ्या
खऱ्या देशभक्तांना या हृदयातून वचन दिलं ग मी.
स्वतंत्र भारताची धुरा वाहून घेईन
बस ते वचन निभवायचे मला.

अनंत कळा सोसताहेत आज ही भारतीय
कित्येक संकटाना तोंड देतात बिचारे
फक्त फरक इतकाच पहिले इथे राज्यकर्ते होते परकीय
आता आहेत देशीय
भांडवल आहे त्यांचं भेदाभेद
कोणी मांडतो प्रांतवाद, कोणी भाषवाद, कोणी जातीवाद या
भेदाभेद करणाऱ्यानाच मातीमोल करायचंय मला
फक्त त्यासाठी तुझी साथ हवी आहे
फक्त त्यासाठी तुझी साथ हवी आहे.

## विद्यार्थ्यांनी नौकरी ऐवजी स्वंयरोजगारावर भर द्यावा - प्राचार्य डॉ. माणिक थीटे



**मंठा** : सध्याच्या परिस्थितीत नोकरी मिळणे अवघड झाले असून विद्यार्थ्यांनी व तरुणांनी नोकरीच्या मागे न लागता स्वंयरोजगारावर भर द्यावा असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. माणिकराव थिटे यांनी केले.

ते स्वामी विवेकानंद महाविद्यालयात आयोजित मशरूम उत्पादन कार्यशाळेच्या कार्य-क्रमात बोलत होते यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून न्यूट्रीमिस्ट मशरूम फार्म संभाजीनगरचे संचालक श्री रामेश्वर शेवाळे, उपप्रचार्य प्रा. सुधाकर जाधव उपप्राचार्य प्रा. सदाशिव कमळकर इत्यादी उपस्थित होते.

प्रारंभी कार्यशाळेचे प्रमुख पाहुण्याच्या हस्ते दीप प्रज्वलन करून उद्घाटन करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे श्री रामेश्वर शेवाळे म्हणाले की नोकरीच्या संधी दुर्मिळ होत असताना मशरूम उत्पादनाचा उद्योग यशस्वीपणे करता येतो.

यावेळी त्यांनी मशरूमचे वेगवेगळे प्रकार, मशरूमची भारतातील परिस्थिती, मशरूम निर्मिती करत असताना घ्यावयाची काळजी, स्पॉन कसे तयार करावे मशरूम बेड कसा तयार करावा उपलब्ध कच्चा माल, मशरूमची काढणी, व मार्केटिंग कसे करावे याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. मशरूम निर्मिती हा आजच्या काळात एक फायद्याचा व्यवसाय ठरू शकतो असे त्यांनी सांगितले.

अध्यक्षीय समारोप करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. माणिकराव थीटे म्हणाले की आजच्या काळात नोकरी मिळण्याच्या संधी कमी होत आहेत अशावेळी मशरूम उत्पादनासारखे स्वयरोजगार तरुणांनी उभारून रोजगाराची निर्मिती करून देशाच्या विकासात हातभार लावावा.

यावेळी डॉ. सतीश मगर, डॉ. राजेंद्र काकडे, राजेश गायकवाड व सर्व प्राध्यापक वृंद, विद्यार्थी - विद्यार्थिनी उपस्थित होते.

या कार्यशाळेचे सूत्र-संचालन डॉक्टर राजेंद्र काकडे यांनी केले प्रास्ताविक पर भूमिका डॉ. सतीश मगर यांनी मांडली. तर आभार प्रदर्शन डॉक्टर राजेश गायकवाड यांनी केले ही कार्यशाळा पार पाडण्यासाठी श्री गणेश मुसळे, शुभम उबाळे, विशाल गोडंगे, नंदिनी सदावर्ते, पूजा झोल, प्रियंका मोरे यांनी विशेष परिश्रम घेतले

## मिस्टर चिखलीकर! याचा हिशेब योग्यवेळी सेटल केला जाईल, अंबादास दानवे



**छत्रपती संभाजीनगर** : फेसबुकवर भाजप नेत्याविषयी केलेल्या एका कथित वादग्रस्त पोस्ट प्रकरणी भाजप कार्यकर्त्यांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या एका कार्यकर्त्याची बोटे छाटल्याची भयंकर घटना नांदेडच्या लोह्यात घडली आहे. विधानपरिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेत, या घटनेचा योग्यवेळी 'हिशेब सेटल' करण्याचा इशारा दिला आहे.

विधानसभा निवडणुकीमुळे राज्याचे वातावरण चांगलेच तापले आहे. शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेसमधील फुटीनंतर स्थिती अतिशय संवेदनशील बनली आहे. यामुळे किरकोळ कारणांवरुन राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्यांत वाद उद्भवत आहेत. त्याची प्रचिती नांदेडच्या लोहा तालुक्यात आली आहे. लोह्याचे ठाकरे गटाचे उपशहरप्रमुख संतोष वडवळे यांनी फेसबुकवर भाजपच्या स्थानिक नेत्याविरोधात एक पोस्ट टाकली होती. या पोस्टमुळे भाजप कार्यकर्त्यांचा राग अनावर झाला आणि त्यांनी थेट वडवळे यांची बोटेच छाटून टाकली.

यासंबंधीच्या वृत्तानुसार, भाजप पदाधिकाऱ्यांनी नांदेड शहरापासून जवळच असलेल्या तुप्पा शिवारातील एका धाब्यावरून संतोष वडवळे यांचे अपहरण केले. त्यानंतर त्यांना बेदम मारहाण करण्यात आली. हल्लेखोर एवढ्यावरच थांबले नाही. त्यांनी वडवळे यांची २ बोटे छाटून टाकली. या हल्ल्याची माहिती मिळताच वडवळे यांचे कुटुंबीय व ठाकरे गटाच्या त्यांना लगतच्या एका रुग्णालयात दाखल केले. तसेच आरोपींवर गुन्हा दाखल करण्याची मागणी केली.

विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी या घटनेची गंभीर दखल घेत भाजपला निर्वाणीचा इशारा दिला आहे. देवेंद्र जी, तुमच्या या चेल्यांना आवरा. एखाद्या सोशल मीडिया पोस्ट वरून अशी मारहाण करणे कोणत्या बौध्दिकात शिकवले जाते?

आणि हो, मिस्टर चिखलीकर! याचा हिशेब ठेवला जाईल आणि योग्यवेळी तो सेटल पण केला जाईल. तुमचे कार्यकर्ते नांदेड आणि इथले लोक आपली जागिर समजत असतील तर ते मूर्खाच्या नंदनवनात हिंडत आहेत, असे दानवे यांनी आपल्या एका पोस्टमध्ये म्हटले आहे.

लोहा येथील ठाकरे गटाचे उपशहरप्रमुख संतोष वडवळे यांनी फेसबुकवर एक पोस्ट केली होती. त्यात त्यांनी नांदेडचे पार्सल चिखलीला आले आणि लोह्याचे पार्सल आता चिखलीला पाठवायचंय, असे नमूद केले होते. त्यांची ही पोस्ट भाजपचे स्थानिक नेते तथा माजी खासदार प्रतापराव चिखलीकर यांना उद्देशून असल्याचे सांगितले जात आहे. पोस्टमुळेच त्यांच्यावर हल्ला झाल्याचे सांगण्यात येत आहे.




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ०४ ऑक्टोबर २०२४

## आम्हाला विरोध केल्यास आमचे शिवसैनिक देखील तुमचा हिशेब चुकता करतील - अब्दुल सत्तार



**सिल्लोड :** विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महायुती आणि महाविकास आघाडीकडून मोर्चेबांधणी सुरू आहे. अद्याप दोन्ही आघांडींकडून जागावाटप झालेले नाही. अशात शिंदे गटाच्या मंत्र्याने केलेल्या वक्तव्यामुळे महायुतीमध्ये ठिणणी पडण्याची शक्यता आहे.

तुम्ही आम्हाला विरोध केल्यास आमचे शिवसैनिक देखील पूर्ण हिशोब चुकता करतील, असा थेट इशारा मंत्री अब्दुल सत्तार यांनी भाजपला दिला आहे. अब्दुल सत्तार यांनी भाजपवर निशाण साधत थेट इशारा दिल्याने याची राजकीय वर्तुळात चर्चा रंगली आहेत.

शिंदे गटाचे मंत्री अब्दुल सत्तार म्हणाले की, भारतीय जनता पक्षाने आम्हाला विरोध केल्यास आमचे शिवसैनिक देखील त्याचा पूर्णपणे हिशोब घेतील. भाजपचे लोक सिल्लोडमध्ये ज्या पद्धतीने काम करतील, त्याच पद्धतीने आमचे कार्यकर्ते मराठवाडा तसेच महाराष्ट्रभर काम करतील, सिल्लोडमध्ये जर मला विरोध केला तर संपूण मराठवाड्यात शिवसेनाही सेच वागणार, असे अब्दुल सत्तार म्हणाले. सिल्लोडमध्ये भाजपने अब्दुल सत्तार यांनी विरोध करायला सुरुवात केल्यानंतर अब्दुल सत्तारांनीही मागेपुढे न बघता भाजपला थेट इशाराच दिला आहे. यामुळे आता महायुतीमधील वरीष्ठ नेत्यांपुढे नवीन पेच निर्माण होण्याची शक्यता आहे.

सिल्लोडमध्ये सत्तारांविराधात मोर्चे सत्तार यांच्या समर्थकांनी भाजप कार्यकर्त्यांवर गुन्हे दाखल केल्याचा निषेधार्थ मंत्री अब्दुल सत्तार यांच्या विरोधात सिल्लोडमध्ये सोमवारी भाजपसह इतर संघटनांनी आंदोलने केली. त्यानंतर अब्दुल सत्तार यांनी आज भाजपला थेट इशारा दिला आहे.

सिल्लोड हा पाकिस्तान होत चालला आहे, अशी टीका रावसाहेब दानवे यांनी सत्तारांवर केली होती. यानंतर अब्दुल सत्तार यांनीही प्रत्युत्तर देत सिल्लोडला बदनाम करणे योग्य नाही, रावसाहेब दानवे यांच्या वक्तव्याचा परिणाम भाजपला भोगावा लागेल, असा थेट इशारा सत्तारांनी दिला होता. लोकसभा निवडणुकीत भाजपचे माजी खासदार रावसाहेब दानवे यांचा पराभव झाला होता. सत्तार यांनी दानवेंचा प्रचार न करता काँग्रेसचा उमेदवार निवडून आणल्याचा सत्तार यांच्यावर आरोप होत आहे. त्यामुळे सिल्लोडमध्ये अब्दुल सत्तार यांच्याविरोधात भाजपमधून नाराजी व्यक्त होत असताना दिसत आहे.

## ठाकरे गटाच्या अरुण गवळीच्या मुलीला भायखळयात उमेदवारी देण्याची चर्चा



**मुंबई :** आगामी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने सर्वच पक्षांनी जोरदार तयारी सुरू केली आहे. राज्याच्या विविध ठिकाणी नेत्यांच्या सभा तसेच दौरे सुरू झाले आहेत. तसेच इच्छुक उमेदवारांचे देखील संधी मिळविण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. एकीकडे महायुती सरकारचे सत्ता टिकवण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत तर दुसरीकडे महाविकास आघाडी अनेक बड्या नेत्यांना आपल्याकडे घेण्याचे प्रयत्न करत आहेत. याच पार्श्वभूमीवर शिवसेना ठाकरे गटाने अंडरवर्ल्ड डॉन अरुण गवळी यांची कन्या गीता गवळी यांच्याशी संपर्क साधल्याचे समोर आले आहे.

शिवसेना ठाकरे गटाचे सचिव तथा आमदार मिलिंद नार्वेकर यांनी गीता गवळी यांची दगडी चाळीत जाऊन भेट घेतली आहे. तसेच गीता गवळी देखील भायखळा विधानसभा मतदारसंघातून लढण्यास इच्छुक असल्याचे समजते. लोकसभा निवडणुकीच्यावेळी गीता गवळी यांनी भाजपला पाठिंबा दिला होता. मात्र त्यानंतर झालेल्या राजकीय घडामोडींनंतर गीता गवळी यांनी ठाकरे गटाच्या मशाल चिन्हावर निवडणूक लढण्याची इच्छा व्यक्त केली आहे.

गीता गवळी या त्यांनी स्थापन केलेल्या अखिल भारतीय सेनेच्या नगरसेविका देखील होत्या, तसेच त्या आरोग्य समितीच्या अध्यक्षा देखील राहिल्या आहेत. दक्षिण मुंबईमध्ये अरुण गवळी यांना मानणारा मोठा वर्ग आहे. त्यामुळे विधानसभा निवडणुकीत शिवसेना ठाकरे गटाला गीता गवळी यांचा फायदा होऊ शकतो. तसेच लोकसभा निवडणुकीच्या वेळी त्यावेळचे विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी गीता गवळी यांना महापौर करण्याचे आश्वासन दिले होते. मात्र आता गीता गवळी ठाकरे गटाच्या संपर्कात असल्याचे समोर आले आहे.

दरम्यान, विधानसभा निवडणुक आता अवघ्या काही दिवसांवर येऊन पोहोचली आहे. अशात राज्याच्या राजकारणात मोठ्या घडामोडी घडत आहेत. पुणे येथील भाजप नेते हर्षवर्धन पाटील यांनी राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाचे अध्यक्ष शरद पवारांची मुंबईत जाऊन भेट घेतली आहे. त्यामुळे आता हर्षवर्धन पाटील भाजप पक्षाला रामराम करत महाविकास आघाडीत जाऊन तुतारी हातात घेणार असल्याच्या चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहेत.

## शिंदेंच्या मंत्रिमंडळात दारुवाले अन् मटकावाले : लक्ष्मण हाके

**मुंबई :** मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारमध्ये दारुवाले, मटकावाले, पैसेवाले व गुटखावाल्यांचा समावेश आहे. यातील अनेकांना रिझर्व्हेशनचे स्पेलिंगही येत नाही. त्यामुळे आम्ही या नेत्यांना घरी बसवणार, असा दावा ओबीसी आंदोलक लक्ष्मण हाके यांनी गुरुवारी शिंदे महायुती सरकारवर निशाणा साधताना केला.

मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देण्याची मागणी केली आहे. पण लक्ष्मण हाकेंसह इतर ओबीसी नेत्यांनी त्याला कडाडून विरोध केला आहे. सरकारने जरांगे पाटलांच्या मागणीवर सकारात्मक भूमिका घेतल्याच्या पार्श्वभूमीवर हाके यांनी उपरोक्त टीका केली आहे.

लक्ष्मण हाके म्हणाले, महायुती सरकारमध्ये दारुवाले, मटकावाले, पैसेवाले व गुटखावाल्यांचा समावेश आहे. यातील अनेकांना रिझर्व्हेशनचे स्पेलिंगही येत नाही. त्यामुळे या निवडणुकीत आम्ही या नेत्यांना घरी बसवणार.

आगामी विधानसभा निवडणुकीत ओबीसी बांधवांना एससी, एसटी, अल्पसंख्यकांना मदतदान करतील. ओबीसी असंघटित आहे. याचा अर्थ ओबीसीला काही कळत नाही असे नाही. नालायक लोक विधानसभेत असतील तर आम्ही विधानसभेत लायक माणसे पाठवू. घटनात्मक तत्वावर बोलणारी माणसे पाठवू. आम्ही उद्या मुंबईला जाणार आहोत. आम्ही काही जणांची यादी तयार केली आहे.

आम्ही जवळपास १०० मतदारसंघांतील लोकांची मते जाणून घेतली. आम्ही प्रॅक्टिस करतो, केवळ बोलत नाही. ही यादी जातनिहाय लोकांची आहे. त्यात जरांगेंना रसद पुरवणाऱ्या, पाठिंबा देणाऱ्यांचा समावेश आहे. या सर्वांना ओबीसी समाज पाडणार आहे, असे लक्ष्मण हाके म्हणाले.

## 'वंचित' बरखास्त करा - रामदास आठवले





**सातारा :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू तथा वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी आपला पक्ष बरखास्त करून रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या ऐक्यासाठी रिपाइंचे अध्यक्षपद स्वीकारावे. त्यांच्या या कृतीमुळे या पक्षाची महाराष्ट्रात ताकद वाढेल. विशेषतः त्यांच्यासाठी मी स्वतः रिपाइंचे अध्यक्षपद सोडण्यास तयार आहे, अशी थेट ऑफर केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री व रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे राष्ट्रीय अध्यक्ष रामदास आठवले यांनी प्रकाश आंबेडकरांना दिली आहे

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया च्या ६७ व्या वर्धापन दिनानिमित्त रामदास आठवले साताऱ्यात आले होते. यावेळी रिपाइंचे राज्य प्रदेशाध्यक्ष राजाभाऊ सरवदे, कार्याध्यक्ष बाबुराव कदम, सरचिटणीस गौतम सोनवणे, पर्यावरण विभागाचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रवीण ढमाळ, रिपाइं सातारा जिल्हाध्यक्ष अशोक गायकवाड आदी नेते उपस्थित होते.

रामदास आठवले पुढे म्हणाले, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी शेड्युल कास्ट फेडरेशन ऑफ इंडिया व स्वतंत्र मजूर पार्टी या दोन पक्षांच्या माध्यमातून निवडणूक लढवण्याचा प्रयत्न केला. मात्र त्यांना महाराष्ट्रात यश आले नाही त्यांच्या महापरिनिर्वाणानंतर त्यांच्या अनुयायांनी स्थापलेला पक्ष हा खरा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया पक्ष आहे. तो पक्ष आम्ही चालवत आहोत. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या अन्य गटातटांनी मतभेद विसरून मूळ रिपाइं व्हावे. यामुळे महाराष्ट्रात आपले राजकीय ऐक्य वाढणार आहे.

प्रकाश आंबेडकर यांनी या प्रकरणी वंचित बहुजन आघाडी बरखास्त करून डॉ. बाबासाहेबांचे वारस म्हणून रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया या मूळ पक्षामध्ये सामील व्हावे आणि स्वतः राष्ट्रीय अध्यक्ष पद स्वीकारावे. त्यांच्यासाठी मी स्वतः अध्यक्षपद सोडायला तयार आहे. या पक्षाच्या माध्यमातून ऐक्य वाढले, तर सत्तेमधील आपला सहभाग हा निश्चित आहे, असे ठामपणे आठवले यांनी सांगितले. मात्र मी दिलेल्या ऑफरवर प्रकाश आंबेडकर कधीही भाष्य करत नाहीत. त्यांनी एक पाऊल पुढे टाकावे. त्याच्या पुढचे एक पाऊल टाकायला मी तयार आहे, अशी ऑफर त्यांनी दिली

महायुतीने यंदा महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीत रिपब्लिकन पक्षाला विदर्भ , उत्तर महाराष्ट्र , पश्चिम महाराष्ट्र या तीन प्रादेशिक विभागात आठ विधानसभेच्या जागा द्याव्यात. दोन महामंडळे आणि विधान परिषदेच्या बारा आमदारांमध्ये एक जागा रिपाईला सोडण्यात यावी अशी मागणी त्यांनी केली. आगामी विधानसभा निवडणुकांमध्ये महायुतीच्या १७० जागा येतील असा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला. महाविकास आघाडीला संविधान बदल तसेच वेगवेगळ्या मुद्द्यावर केलेला खोटा प्रचार असल्याने यश मिळणार नाही. काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी अमेरिकेत जाऊन आरक्षण संपवण्याची भाषा केली आहे. त्याचा फटका त्यांना विधानसभा निवडणुकात बसेल. महाराष्ट्रात काँग्रेसला यश मिळणार नाही असे ठामपणे आठवले यांनी सांगितले .

सातारा जिल्ह्यामध्ये फलटण विधानसभा मतदारसंघाचे आरक्षित जागा रिपाईला मिळावी अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. केंद्र शासनाने समान नागरी कायदा आणि वक्फ बोर्ड कायदा आणण्याची तयारी चालवली आहे हे दोन्ही कायदे मुस्लिम समाजाच्या विरोधात नाही वक्फ बोर्ड कायदा हा प्रस्थापितांची एकाधिकारशाही मोडून मुस्लिम समाजाला फायदा करून देणारा कायदा आहे. समान नागरी कायद्यामुळे हिंदू व मुस्लिम समाजामध्ये संबंध समन्वयाचे राहणार आहेत. या कायद्याविषयी गैरसमज पसरवला जाऊ नये असे ते म्हणाले.

जम्मू काश्मीर येथील निवडणुकांमध्ये रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे चार उमेदवार उभे करण्यात आले आहेत. भारतीय जनता पार्टीला येथे रिपाईने पाठिंबा दिलेला आहे. सत्ता कोणाची असो त्यामध्ये रामदास आठवले यांचा सहभाग असतोच अशी राजकीय टिप्पणी केंद्रीय बांधकाम मंत्री नितीन गडकरी यांनी केली होती. या प्रश्नावर बोलताना रामदास आठवले यांनी मिश्किली केली ते म्हणाले मला राजकीय हवेचा रोख कळतो. मी ज्या पक्षाला पाठिंबा देतो ते सरकार सत्तेमध्ये येते.

## जिल्हा परिषद शिक्षकाविरोधात गुन्हा दाखल - अश्लील भाषेत विद्यार्थ्यांना शिवीगाळ

**परभणी :** राज्यात महिलांच्या विरोधातील गुन्ह्यांमध्ये विशेषतः शाळेतील मुलींच्या विरोधातील गुन्हे दिवसेंदिवस वाढतच जात असल्याचे दिसत आहे. बदलापूर प्रकरण झाले, त्यानंतर पुणे येथील शाळा बस चालकाने ८ वर्षांच्या दोन मुलींवर लैंगिक अत्याचार केले आणि आता मराठवड्यातील परभणीच्या मानवत येथील जिल्हा परिषद शाळेत शिक्षकाकडून विद्यार्थ्यांना अश्लील भाषेत शिवीगाळ केल्याचे उघडकीस आले आहे.

मानवत येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेमधील शिक्षकाने आठवीच्या विद्यार्थ्यांना अश्लील भाषेचा वापर करत शिवीगाळ केल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी वर्गातील विद्यार्थिनींनी पोलिसांच्या जनजागृती कार्यक्रमात गुप्तपणे तक्रार केली होती. त्यानंतर या प्रकरणाचा तपास केल्यानंतर ही घटना सत्य असल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर मुख्याध्यापकांच्या फिर्यादीवरून सदर शिक्षाच्या विरोधात मानवत पोलिस ठाण्यात पॉक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच या शिक्षकाला तातडीने सेवेतून देखील निलंबित करण्यात आले आहे. दत्ता होगे असे या निलंबित शिक्षकाचे नाव आहे.

मानवत पोलिसांच्या निर्भया पथकाकडून विविध शाळांमध्ये जनजागृती अभियान राबविण्यास सुरू केले आहे. याच अभियानाचा भाग म्हणून जिल्हा परिषद शाळेत गेले असताना आठवीच्या काही विद्यार्थिनींनी घडलेला प्रकार पोलिस कर्मचारी शकुंतला चांदीवाले आणि सय्यद फयाज यांना सांगितला. त्यानंतर निर्भया पथकाने तातडीने चौकशी करत या प्रकरणात कारवाई सुरू केली.

आरोपी शिक्षक दत्ता होगे हे नेहमीच विद्यार्थी आणि विद्यार्थिनींना अश्लील भाषेत बोलून मारहाण देखील करत असल्याचे चौकशीतून समोर आले आहे. पोलिसांनी ही बाब मुख्याध्यापकांकडे कळवली असता मुख्याध्यापिका श्रीमती छाया उमाजी गायकवाड यांनी शिक्षक दत्ता होगे यांच्या विरोधात फिर्याद देत गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्हा दाखल झाल्यानंतर जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नीतीशा मातुर यांनी या शिक्षकांच्या निलंबनाचे आदेश काढले आहेत.



# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ०४ ऑक्टोबर २०२४


# कढीपत्ता खाण्याचे फायदे



कढीपत्त्याच्या आत अनेक औषधी गुणधर्म आहेत, जे तुमचे आरोग्य चांगले राखण्यासाठी उपयुक्त ठरतात. याच्या वापराने केस आणि त्वचेच्या पोषणासोबतच तुमचे शरीरही आतून तंदुरुस्त राहते. चला तर मग जाणून घेऊया कढीपत्त्याचे आरोग्यदायी फायदे.

अशक्तपणाची तक्रार दूर होते, कढीपत्त्यात लोह आणि फॉलिक ऍसिड भरपूर प्रमाणात असते. ऍनिमिया म्हणजे शरीरात रक्ताची कमतरता तर असतेच, पण शरीरात रक्त योग्य प्रकारे शोषून घेण्याच्या असमर्थतेशीही त्याचा संबंध असतो.

फॉलिक ऍसिड हा एक आवश्यक घटक आहे जो रक्ताला शोषण्यास मदत करतो. जर तुम्हाला ऍनिमियाचा त्रास होत असेल तर त्यावर मात करण्यासाठी दररोज कढीपत्ता खा.

कढीपत्त्यामध्ये फॉलिक ऍसिड आणि लोह दोन्ही चांगल्या प्रमाणात असल्याने ते रक्त शोषून घेतात. त्यामुळे याचे सेवन केल्याने तुम्ही तुमच्या शरीरातील रक्ताची कमतरता दूर करू शकता. गरम पाणी पिण्याचे फायदे आणि तोटेयकृताचे / लिव्हरचे आरोग्य चांगले राहते

जर तुम्ही भरपूर अल्कोहोल किंवा भरपूर मसालेदार मांस, मासे आणि चिकन खात असाल तर, त्यामुळे तुमच्या यकृताला कोणत्याही प्रकारचे नुकसान होऊ नये म्हणून कढीपत्ता नियमित खा. एशियन जर्नल ऑफ फार्मास्युटिकल्समध्ये प्रकाशित झालेल्या एका संशोधनानुसार, तुमच्या आहारात कढीपत्ता समाविष्ट करून तुम्ही तुमच्या यकृताला कोणत्याही प्रकारच्या ऑक्सिडेटिव्ह तणावापासून दूर ठेवू शकता. एवढेच नाही तर यकृतामध्ये तयार होणारे विष बाहेर टाकण्यासाठी तुम्ही याचा वापर करू शकता.

कढीपत्त्याच्या आत असलेले व्हिटॅमिन ए आणि सी यांचे मिश्रण यकृतामध्ये होणारे कोणतेही नुकसान भरून काढण्यासाठी आणि ते योग्यरित्या कार्य करण्यासाठी उपयुक्त ठरते. कसा उपयोग करायचा - एक कप देशी तुपात एक कप कढीपत्त्याचा रस मिसळा. आता त्यात थोडी साखर आणि काळी मिरी पावडर टाकून चांगले उकळा.

उकळताना गॅसची आच मंद ठेवा. हे मिश्रण थंड झाल्यावर प्या. तुमच्या यकृतातील विषारी द्रव्ये बाहेर पडतील आणि तुमचे यकृत योग्यरित्या काम करू शकेल. रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित ठेवते.

कढीपत्त्याचे नियमित सेवन केल्याने रक्तातील साखरेचे प्रमाण नियंत्रणात राहते. जर्नल ऑफ प्लांट फूड फॉर न्यूट्रिशनमध्ये प्रकाशित झालेल्या संशोधनातून असे समोर आले आहे की, जर तुम्ही कढीपत्ता खाल्ल्यास तुमच्या रक्तातील साखरेची पातळी वाढत नाही आणि इन्सुलिन योग्य प्रकारे तयार होते.

हे तुम्हाला मधुमेहासारख्या आजारांपासून दूर ठेवते. कढीपत्त्याच्या आत असलेले फायबर तुमच्या साखरेवर नियंत्रण ठेवण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावते. याचे सेवन केल्याने, तुमची पचनसंस्था योग्यरित्या कार्य करते, ज्यामुळे तुम्ही टाइप टू मधुमेहासाठी जबाबदार असलेल्या लठ्ठपणापासून दूर राहता.

जर तुम्ही मधुमेहाचे रुग्ण असाल तर प्रत्येक आहारात कढीपत्ता असेल याची खात्री करा. याशिवाय सकाळी रिकाम्या पोटी कढीपत्ता चावा, यामुळे तुमची साखर नियंत्रणात राहते.

कढीपत्त्याच्या आत असे घटक देखील असतात, जे तुमच्या शरीरातील बॅड कोलेस्ट्रॉल बाहेर काढून शरीरातील कोलेस्टेरॉलची पातळी नियंत्रित करण्यात मदत करतात. कढीपत्त्यात अँटिऑक्सिडेंट असतात, ज्यामुळे तुमचा रक्तदाब नियंत्रित राहतो आणि तुमचा हृदयविकाराचा धोका टळू शकतो

# प्रियांका चोप्रा नादियाच्या भूमिकेत परतणार



प्रियांका चोप्रा जोनास लवकरच तिच्या 'सिटाडेल' या स्पाय ॲक्शन सीरिजच्या नवीन सीझनद्वारे चाहत्यांच्या भेटीस येणार आहे. या सिरीजचा पहिला सीझन २०२३ साली आला आणि त्याने काही वेळातच प्रेक्षकांच्या हृदयात स्थान निर्माण केले. या मालिकेत ॲक्शन, ड्रामा आणि बुद्धिमत्व यांचा उत्तम मिलाफ पाहायला मिळाला.

ती OTT वर सर्वाधिक पहिल्या स्थानावर असलेली सिरीज होती. आता 'सिटाडेल सीझन २' सोबतही तीच जादू कायम ठेवण्यात यशस्वी होईल असे आपण म्हणू शकतो. येत्या सीझनमध्ये तुम्हाला नवीन काय पाहायला मिळणार आहे जाणून घ्या.

आगामी सीझनमध्ये सस्पेन्स कायम ठेवण्यासाठी निर्मात्यांनी अद्याप कथेबद्दल कोणतीही विशिष्ट माहिती दिलेली नाही. जर तुम्ही 'सिटाडेल' चे चाहते असाल तर तुम्हाला माहित असेल की पहिल्या सीझनमध्ये अनेक रहस्ये होती ज्यांची उत्तरे चाहत्यांना मिळाली नाहीत आणि अनुत्तरित राहिली, त्यापैकी एक मेसनची खरी ओळख होती. अशा अनेक प्रश्नांची उत्तरे 'सिटाडेल २' मध्ये मिळतील अशी अपेक्षा आहे.

प्रियांका चोप्रा जोनास सीझन २ मध्ये नादिया सिंगच्या भूमिकेत परतणार आहे. अभिनेत्रीचा सहकलाकार रिचर्ड मॅडेन हा मेसन केन/काईल कॉनरॉयच्या भूमिकेत दिसणार आहे. याशिवाय स्टॅनले टुसी, लेस्ले मॅनविले, अ‍ॅशले कमिंग्स, रोलँड मोलर, निक्की अमुका-बर्ड आणि मोइरा केली हे इतर कलाकार दिसणार आहेत.

आत्तापर्यंत, सिटाडेल सीझन २ साठी कोणत्याही प्रकाशन तारखेची पुष्टी केलेली नाही. पुढील दोन महिन्यांत दोन स्पिन-ऑफ रिलीज होतील (सिटाडेल: डायना, १० ऑक्टोबरला आणि सिटाडेल: हनी बनी, ७ नोव्हेंबरला) रिलीज होणार आहे. त्यानुसार पुढील वर्षी दुसरा सीझन रिलीज होऊ शकतो. मिळालेल्या माहिती-नुसार, २०२५ मध्ये प्राइम व्हिडिओवर सिक्वेल रिलीज होणार आहे. तसेच, जो रुसो सिटाडेल सीझन २ चे सर्व भाग दिग्दर्शित करणार आहेत.

# गुणरत्न सदावर्ते यांनी महायुतीकडे मागितली उमेदवारी

**मुंबई** : आपल्या वादग्रस्त विधानांमुळे कायम चर्चेत असणाऱ्या वकील गुणरत्न सदावर्ते यांनी वरळी विधानसभा मतदारसंघातून निवडणुकीच्या मैदानात उतरण्याची घोषणा केली आहे. मी वरळीतून निवडणूक लढवणार असून, आदित्य ठाकरे यांना पराभवाची धूळ चारण्याचा माझा निर्धार आहे, असे त्यांनी गुरुवारी एका मराठी वृत्तवाहिनीशी बोलताना म्हटले आहे.

गुणरत्न सदावर्ते म्हणाले की, आदित्य ठाकरे यांना धूळ चारण्यासाठी माझी वरळी विधानसभा मतदारसंघातून निवणुकीच्या रिंगणात उतरण्याची इच्छा आहे. माझी ही इच्छा मी पक्षश्रेष्ठींना कळवली आहे. मी ज्या विचारांच्या लोकांसाठी काम करत आहे, त्यांच्या कानावर मी माझ्या भावना टाकल्या आहेत. मी वरळीतून लढलो तर मला २५ हजारांहून अधिक लीड मिळेल. यामुळे आदित्य ठाकरे यांचा पराभव झाल्याशिवाय राहणार नाही.

मी आतापर्यंत केव्हाच शरद पवारांना घाबरलो नाही. उद्धव ठाकरेंना घाबरण्याचा प्रश्नच येत नाही. त्यांना मी सहजपणे उडवून लावले. त्यामुळे महायुती माझ्या नावाचा विचार नक्कीच करेल असा विश्वास आहे. मी वरळी येथील जिजामाता नगरमधील ८ हजार झोपडपट्टीवासियांचा विकास करेन. त्यांना ६०० चौरस फुटांचे घर देईल. एक मोठा विकास मी तिथे करून दाखवेन.

गुणरत्न सदावर्ते यांनी यावेळी महायुती सरकारच्या शिवनेरी सुंदरी योजनेवरही निशाणा साधला. त्यांनी यासंबंधी एसटी महामंडळाचे अध्यक्ष भरत गोगावले यांच्यावर टीका केली. ते म्हणाले, भरत गोगावले यांना मी एवढेच सांगेन की, त्यांच्याकडे वेळ फार कमी आहे. त्यामुळे त्यांना एसटी महामंडळामध्ये क्रांती करायची असेल, तर त्यांनी ७ वा वेतन आयोग लागू करावा. त्यातून आमच्या महिला भगिनींना न्याय द्यावा.

आमच्या वाहकांवर ज्या छोट्या - मोठ्या कारवाया होतात, तो जीआर त्यांनी हाणून पाडावा. आमच्या महिला या सक्षम आहेत. त्या भिमाईच्या स्वरूप आहेत. रमाईच्या स्वरूप आहेत. माता जिजाऊच्या स्वरूप आहेत. त्यामुळे शिवनेरी सुंदरी ही योजना न काढता गोगावले यांनी माता रमाई ही योजना काढावी. महिलांना सशक्त बनवावे.




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ०४ ऑक्टोबर २०२४


## जेल मॅन्युअलचे भेदभाव वाढणारे नियम हटवा - सुप्रिम कोर्ट



**दिल्ली :** विशिष्ट जातीच्या कैद्यांना घाणीच्या टाक्या स्वच्छ करायला लावणे चुकीचे, पोलिसांनी कारवाई करावी.

सुप्रीम कोर्टाने जेल मॅन्युअलमधून जातीय भेदभाव वाढवणारे नियम काढून टाकण्यास सांगितले आहे. सुप्रीम कोर्टाने काही राज्यांना कारागृहातील काम जातीच्या आधारावर वाटूनये असे निर्देश दिले आहेत.

कारागृहातील कामाचे जातीच्या आधारे वाटप करण्याबाबत सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली होती. मुख्य न्यायमूर्ती डीवाय चंद्रचूड, न्यायमूर्ती जेबी पार्डीवाला आणि न्यायमूर्ती मनोज मिश्रा यांच्या खंडपीठाने गुरुवारी दिलेल्या आदेशात म्हटले की, या गोष्टींना परवानगी देता येणार नाही.विशिष्ट जातीच्या कैद्यांना गटाराच्या टाक्या स्वच्छ करायला लावणे चुकीचे आहे, असेही सर्वोच्च न्यायालयाने आदेशात म्हटले आहे. याप्रकरणी पोलिसांनी कारवाई करावी.सुप्रीम कोर्टाने राज्य सरकारांना ३ महिन्यांच्या आत जेल मॅन्युअलमध्ये जातीय भेदभाव वाढवणाऱ्या नियमांमध्ये बदल करण्याचे आदेश दिले.

ही बाब पत्रकार सुकन्या शांता यांनी मांडली होती. त्यांनी डिसेंबर २०२३ मध्ये सर्वोच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली आणि असा युक्तिवाद केला की देशातील सुमारे १७ राज्यांमधील तुरुंगात कैद्यांवर जाती-आधारित भेदभाव केला जात आहे.

यावर पहिली सुनावणी जानेवारी २०२४ मध्ये झाली. न्यायालयाने १७ राज्यांना नोटीस पाठवून त्यांचे उत्तर मागितले आहे. सहा महिन्यांत केवळ उत्तर प्रदेश, झारखंड, ओडिशा, तामिळनाडू आणि पश्चिम बंगाल या राज्यांनी न्यायालयात उत्तर दाखल केले.याचिकाकर्त्या सुकन्या शांता या व्यवसायाने पत्रकार आहेत. त्या मानवी हक्क कायदा आणि सामाजिक न्याय विषयांवर लिहितात. आपल्या बातम्यांद्वारे त्यांनी तुरुंगातील जातिभेदाचा मुद्दा मांडला. २०२० मध्ये या विषयावर एक संशोधन अहवालही तयार करण्यात आला होता. अहवालात भारतातील १७ राज्यांमध्ये कैद्यांमध्ये त्यांच्या जातीच्या आधारे कामाचे वाटप केले जाते, असे नमूद करण्यात आले होते. सुकन्या यांचा हा अहवाल 'द वायर'वर प्रसिद्ध झाला होता.याचिकाकर्त्याने आपल्या अहवालात तीन मुख्य राज्यांचे उदाहरण दिले.

राजस्थानः राजस्थानमधील कैदी न्हावी असेल तर त्याला केस आणि दाढी छाटण्याचे काम मिळेल, तर ब्राह्मण कैद्याला स्वयंपाकाचे काम मिळते. तर वाल्मिकी समाजाचे कैदी साफसफाई करतात.

केरळ: केरळमध्ये नेहमीचा अपराधी आणि वारंवार गुन्हेगार यांच्यात फरक केला जातो. सवयीचे डकैत किंवा चोर हे वेगवेगळ्या वर्गात विभागले गेले. बाकीच्यांपासून वेगळे ठेवले.

उत्तर प्रदेश : उत्तर प्रदेश जेल मॅन्युअल, १९४१ कैद्यांचे जातीय पूर्वग्रह राखण्यासाठी आणि कैद्यांचे जातीय पूर्वग्रह राखण्यासाठी आणि त्यांना जातीच्या आधारावर साफसफाई, पहारा आणि इतर कामे करण्याच्या अधीन आहे.डिसेंबर २०२३ मध्ये याप्रकरणी याचिका दाखल करण्यात आली होती. सर्वोच्च न्यायालयाने १० महिन्यांत सुनावणी पूर्ण केली. १० जुलै रोजी झालेल्या शेवटच्या सुनावणीदरम्यान न्यायालयाने उत्तर प्रदेश जेल नियमातील काही तरतुदीही न्यायालयात वाचल्या होत्या.यानंतर उत्तर प्रदेश सरकारने आमच्या तुरुंगात जातिभेद नसल्याचा युक्तिवाद केला, मात्र सरन्यायाधीश चंद्रचूड यांनी तुरुंगाचे नियम वाचून उत्तर प्रदेश सरकारला फटकारले.

## अविनाश साबळे याला शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार, तर रोहित शर्माचे मार्गदर्शक दिनेश लाड यांना जिजामाता पुरस्कार जाहीर

**मुंबई :** भारताचा धावपटू अविनाश साबळे याला २०२२-२३चा शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार जाहीर झाला आहे. राज्य सरकारने गुरुवारी शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार जाहीर केले. २०२४च्या पॅरिस ऑलिम्पिकमध्ये ३ हजार मीटर स्टीपलचेस स्पर्धेच्या अंतिम फेरीत प्रवेश करून अविनाशने इतिहास घडवला होता.

पदक जिंकता आले नसले तरी अविनाशने नवा राष्ट्रीय विक्रम केला होता. आता राज्य सरकारने त्याला पुरस्कार जाहीर केला आहे. २०२२-२३चा जीवन गौरव पुरस्कार दिग्गज बॅडमिंटनपटू प्रदीप गंधे यांना जाहीर झाला आहे. तर भारताचा कर्णधार आणि स्टार क्रिकेटपटू रोहित शर्मा यांचे मार्गदर्शक दिनेश लाड यांना जिजामाता पुरस्कार जाहीर झाला आहे.१९८२ साली झालेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत प्रदीप गंधे यांनी मिश्र दुहेरीत आणि पुरुष सांघिक गटात कांस्यपदकाची कमाई केली होती.

राज्य सरकारने आज उत्कृष्ट क्रीडा मार्गदर्शकाल देण्यात येणारा जिजामाता पुरस्कार जाहीर केले. हा पुरस्कार पवन भोईर (जिम्नॅस्टिक्स), अनिल घाटे (कबड्डी), राजाराम घाग (दिव्यांग खेळांचे मार्गदर्शक ॲक्वेटीक्स), दिनेश लाड (क्रिकेट), शुभांगी रोकडे (धनुर्विद्या), सुमा शिरुर (पॅराशूटींग) यांना जाहीर झाले आहेत.

दीप रामभीया, आदित्य मेहता, संदीप दिवे, अभिजित त्रिपणकर, निलम घोडके, आदित्य मित्तल, शुशिकला दुर्गा प्रसाद आगाशे, प्रतिक पाटील, काशीश दिपक भराड, गिरीश काते, कुणाल कोठेकर, जान्हवी जाधव, रुपाली गंगावणे, अक्षय तरळ, रुचिता विनेरकर, रुद्रांक्ष पाटील, शाहू माने, याश्वी शाह, सुहद सुर्वे, श्रेयस वैद्य, दिया चितळे, श्रुती कवड, सर्वेश मेनन, सिद्धांत मोरे, पूनम कैथवास, रेनॉल्ड जोसेफ, अक्षता ढेकळे, अपूर्वा पाटील, अंकिता जगताप, पंकज मोहिते, प्रियंका इंगळे, सुयश गरगटे, अक्षया शेडगे, धर्मेंद्र यादव, कोमल वाकळे, नंदिनी साळोखे, कल्याणी जोशी, विष्णू सर्वानन, वैष्णवी पाटील, श्रीकांत निगडे, श्रेया नानकर, साहिल खान, नेहा देशमुख, जयेश मोरे, पूर्वा किनरे, नितिन पवळे.

## मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा



**मुंबई :** मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याचा निर्णय केंद्र सरकारने घोषित केला आहे. महाराष्ट्रातील १२ कोटी जनतेसाठी हा सर्वात मोठा निर्णय समजला जात आहे. गेल्या अनेक वर्षांपासून महाराष्ट्रातील साहित्यिक असतील किंवा इतर अनेक मंडळी असतील त्यांनी मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळावा यासाठी खूप मेहनत घेतली होती तसेच पूर्वीपासूनच याची मागणी राजकीय नेत्यांनी देखील लावून धरण्यात आली होती. त्यामुळे केंद्र सरकारचा हा निर्णय मराठी माणसासाठी एक अभिमानाचा क्षण असल्याचे बोलले जात आहे.

केंद्र सरकारने घेतलेल्या या निर्णयावर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोशल मीडिया X वर लिहिले की, आजचा दिवस मायमराठीच्या इतिहासातील एक ऐतिहासिक दिवस असल्याचे ते म्हणाले आहेत. मराठी भाषेला अभिजात दर्जा देण्याचा निर्णय आज केंद्रीय मंत्रिमंडळाने घेतला. मी मा. पंतप्रधान नरेंद्र मोदीजी आणि केंद्रीय मंत्रिमंडळातील सर्व सन्माननीय मंत्र्यांचे महाराष्ट्रातील १२ कोटी जनतेच्या वतीने अतिशय मनापासून आभार मानतो.

पुढे ते म्हणाले, हा दिवस उजाडावा, यासाठी मी मुख्यमंत्री असताना आणि आताही मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्या नेतृत्त्वात सातत्याने पाठपुरावा केला. लीळाचरित्र, ज्ञानेश्वरी, विवेकसिंधू अशा अनेक ग्रंथाचा आधार घेत मराठी भाषा ही अभिजातच आहे, हे सिद्ध करण्यासाठी अनेक थोरा-मोठ्यांचे, अभ्यासकांचे यासाठी हातभार लागले. मी त्यांचाही अत्यंत आभारी आहे. अखेर आज तो सुदिन अवतरला.

नवरात्रीच्या पहिल्या दिवशी मायमराठीचा हा बहुमान मनाला अतिशय सुखद अनुभूती देणारा आहे. महाराष्ट्रातील आणि जगभरातील तमाम मराठीजनांचे मी अतिशय मनापासून अभिनंदन करतो. मराठी भाषेच्या सर्वांगिण विकासासाठी आता अनुदानासह केंद्र सरकारच्या पातळीवर सुद्धा सर्व ते सहकार्य मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे, असे देवेंद्र फडणवीस म्हणाले आहेत.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी देखील प्रतिक्रिया दिली आहे, ते म्हणाले, अखेर माय मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला! एका लढ्याला यश आले. यासाठी महाराष्ट्र सरकारने केंद्राकडे सतत पाठपुरवठा केला होता. आपल्या लाडक्या भाषेचा यथोचित सन्मान केल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदीजी, तसेच केंद्रीय सांस्कृतिक मंत्री श्री. गजेंद्रसिंह शेखावत यांचे आम्ही आभार मानतो. या कामात अनेक मराठी भाषक, विचारवंत, भाषेचे अभ्यासक, साहित्यिक आणि समीक्षकांचे साह्य झाले. त्यांचेही मन:पूर्वक आभार!

दरम्यान, मराठी भाषेसोबतच पाली, बंगाली, आसामी आणि प्राकृत या भाषांना देखील अभिजात भाषेचा दर्जा देण्याचा निर्णय केंद्रीय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला आहे.





